ग्रामपंचायत निवडणूक
सरपंच पदाची थेट निवडणूक-
मतपत्रिकेचा क्रम व रंग..

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.११/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ ऑगस्ट २०१७

## आदेश

ज्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

२. आणि ज्याअर्थी; शासनाने महाराष्ट्र ग्राम पंचायत (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ दि.१९.७.२०१७) अन्वये ग्रामपंचायतींमधील सरपंच, पंचायतींच्या पात्र मतदारांकडून थेट पद्धतीने निवडून द्यावयाचा आहे. तसेच ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत सरपंच पदासह नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात येणार आहे; आणि यामुळे मतपत्रिकेचा क्रम व रंग याबाबत नव्याने आदेश पारित करणे आवश्यक झाले आहे.

३. आणि त्याअर्थी; भारतीय संविधानाच्या २४३-के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम १०-अ व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम,१९५९ च्या नियम १७ अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

~~३.१ सरपंच पदाच्या निवडणुकीकरिता मतपत्रिकेचा क्रम व रंग -~~

आयोगाच्या क्रमांक ग्रापनि-२००५/प्र.क्र.२६/ का. ८ दि.१८.२.२००६ चे आदेशात अंशत: सुधारणा करुन त्यात सरपंच पदाकरीता मतपत्रिकेचा क्रम व रंग खालीलप्रमाणे राहील:-

i) **पहिली मतपत्रिका : सरपंच पदाच्या जागेची - फिका निळा रंग**

ii) **यानंतर पुढील मतपत्रिका सदस्य पदाच्या निवडणुकीकरीता-** आयोगाच्या दि. १८.२.२००६ च्या आदेशाप्रमाणे (दि.२०.२.२००६ चे राजपत्र) ठेवण्यात यावी.

iii) वरील मतपत्रिकांवर आयोगाच्या क्र.रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२ **दि.१२.११.२०१३ चे आदेशातील सूचनांप्रमाणे** NOTA पर्याय छापण्यात यावा.

iv) **सरपंच पदाकरिता मतपत्रिकेचा नमुना खालीलप्रमाणे राहील:-**

## (सरपंच पदाकरिता मतपत्रिकेचा नमुना) (फिका निळा)

ग्रामपंचायत.........................तालुका .........................जिल्हा...................

सरपंच पदाची सार्वत्रिक/पोट निवडणूक सन २०... आरक्षणाची वर्गवारी.............

| | | |
|---|---|---|
| १. | अ ब क | चिन्ह |
| २. | क ख ग | चिन्ह |
| ३. | च छ ज | चिन्ह |
| ४. | "वरीलपैकी एकही नाही"(NOTA) | (NOTA) |

Aarawade 23/8/17

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) मा. सचिव व उपसचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
५) निवड नस्ती.